# महाराष्ट्र राज्य, सहकार अपिल न्यायालय, मुंबई

एपी जे हाऊस 6 वा मजला, 3 दिनशा वाच्छा रोड, चर्चगेट मुंबई -400020
Email — amcoop@bhc.gov.in No.el. No. 022-22047627

---

जा.क्र.मरासअन्यामु/लेखा/कीटकनाशक फवारणी दरपत्रक सुचना/ 1384 / सन 2025 दिनांक :- 12/09/2025

प्रति ,
1.सहकार आयुक्त वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी https:/sahkarayukta.maharashtra.gov.in
2.नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी

विषय :- महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय मुंबई 3 रा, 5 वा व 6 वा मजला 14660 चौ. फुट आणि ओल्ड कस्टम हाऊस 3 रा मजला, डी डीबिल्डींग येथे 7958 चौ.फुट इतक्या जागेत किटकनाशक फवारणी करणेसाठी दरपत्रक पाठविणेबाबत

संदर्भ :- या कार्यालयाकडील दिनांक 20/7/2024 रोजीचे पत्रान्वये एक्स थॉ फॅसीलीटी मॅनेजमेंट एल एल पी यांना दिलेले पत्र

महाराष्ट्र राज्य, सहकार अपिल न्यायालय, मुंबई , या कार्यालयात परिशिष्टात नमुद केलेल्याप्रमाणे परिशिष्टात नमुद केलेल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय मुंबई 3 रा, 5 वा व 6 वा मजला 14660 चौ. फुट आणि ओल्ड कस्टम हाऊस 3 रा मजला, डी डीबिल्डींग येथे 7958 चौ.फुट इतक्या जागेत किटकनाशक फवारणी करणेसाठी सिलबंद दरपत्रक खालील शर्ती व अटीना अधिन राहुन दिनांक 01/10/2025 रोजी दुपारी 3.00 पर्यत पोस्टाने / हस्ते पोहच मागवित आहे . कमीत कमी रकमेची निवीदा मंजुर करण्यात येईल .कार्यालयाचा पत्ता, चौरस फुट तसेच नेमक्या कीती सेवा अपेक्षीत आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे

| अ क | विवरण | चौरस फुट | एकुण सेवा |
|---|---|---|---|
| 1 | महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय मुंबई 3 रा, 5 वा व 6 वा मजला , दिनशा वाच्छा रोड, चर्चगेट मुंबई -400020 | 14660 | 1 वर्षामध्ये एकुण 12 सेवा |
| 2 | महाराष्ट्र राज्य सहकारी अपिल न्यायालय मुंबई, डी डीबिल्डींग ओल्ड कस्टम हाऊस मुंबई -400038 | 7958 | 1 वर्षामध्ये एकुण 12 सेवा |

अटी व शर्ती खालीलप्रमाणे :-

1) किटकनाशक फवारणी करण्यासाठी निवीदा सादर करण्यापुर्वी कार्यालयीन वेळेत सकाळी 10.40 ते संध्याकाळी 6.00 वाजेपर्यंत समक्ष येऊन कपाट, रेकॉर्ड गठठे नेमके किती आहेत ते समक्ष पहावयास मिळेल .
2) किटकनाशक फवारणी करण्यासाठी निवीदाबाबतची माहिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावलेली आहे.
3) झुरळ, मुंग्या , पाली, उंदीर, वाळवी , लाकडी रॅक, लोखंडी कपाट, लोखंडी रॅक , जुने रेकॉर्ड कापडी गठठे,भींतीमध्ये तसेच कॅबीनमध्ये वाळवी इंजेक्शन इत्यादीकरीता फवारणीकरता नेमक्या किती सेवा उपलब्ध करुन दिल्या जातील याबाबत निवीदा सादर करताना स्पष्ट नमुद करावे तसेच दर तीन महीन्यानंतर फवारणी बील या कार्यालयास सादर करावे . फवारणीवेळी डयुटी केलेले वर्ग -4 कर्मचारी यांनी सादर केलेल्या अहवालानंतर आपणास बील अदा केले जाईल याची नोंद घ्यावी .
4) दुरुस्ती केल्यानंतर आपल्या कंपनीचे कार्डवर या कार्यालयातील उपस्थित निबंधक यांची स्वाक्षरी घेण्यात यावी निबंधक यांचे अनुपस्थित कार्यालय अधीक्षक यांची सही घेण्यात यावी .
5) ज्या निवीदाधारकाची निवड करण्यात येईल त्यांची त्रयस्थ अदाता नोंदणी करण्यासाठी मुळ कॅन्सल चेक, आधार व पॅन कार्ड साक्षांकीत प्रत या कार्यालयास सादर करावी जेणेकरुन बील अदा करताना या कार्यालयास सोईस्कर होईल .
6) प्रत्येक वेळी फवारणी सकाळी 10.40 ते दुपारी 1.00 या सत्रामध्ये ओल्ड कस्टम ऑफीस व दुपारी 2.00 ते 6.00 अपीजे हाऊस येथे फवारणी करण्यात यावी.
7) अंतीम दिनांक 01/10/2025 सायंकाळी 3 वाजेपर्यंत निवीदा या कार्यालयात स्वीकारल्या जाईल
8) सदर निविदा दिनांक 03/10/2025 रोजी दुपारी 2.20 वाजता उघडण्यात येतील त्यासाठी सर्व निविदा धारकांनी हजर रहावे .
9) त्याकरीता वेगळी नोटीस काढल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी .

आपली विश्वासु

12/9/2025

( सौ. सुप्रिया.एस. सापटणेकर )
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य, सहकार अपिल न्यायालय, मुंबई

12/9/2025

प्रत माहीतीसाठी सविनय सादर :-

1) मा.प्रबंधक ,नगर दिवाणी व सत्र न्यायालय मुंबई
2) मा.प्रबंधक , लघुवाद न्यायालय , मुंबई